कि.फौ.ख.क्र.३३/१९९९
सरकार –वि– श्रीकृष्ण
निशाणी क्रमांक ११

आरोपी फरार असल्यामुळे कलम २९९ फौ.प्र.संहितेनुसार बयाण नोंदविण्यात आले.

**सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरू :–**

माझे नाव :– रमेश नारायण मोहे
वय :– ७० वर्ष, व्यवसाय :– काही नाही,
राहणार :– जलंब, ता.शेगांव, जि.बुलढाणा

**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू :–**

१. पोलीसांनी मला पंचनाम्याचे कार्यवाहीसाठी बोलाविल्याचे मला आठवत नाही. माझेसमक्ष पोलीसांनी जप्ती पंचनामा केल्याचे मला आठवत नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही नाही.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणने खरे नाही की सन १९९९ मध्ये पोलीसांनी मला पंचनाम्याचे कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन जलंब येथे बोलाविले होते. हे म्हणने खरे नाही की पोलीस स्टेशनच्या आवारात पोलीसांनी माझेसमक्ष एका हतकडीची पांढ–या रंगाची चावी जप्त केली. हे म्हणने खरे नाही की त्यानंतर माझेसमक्ष पोलीसांनी त्याबाबतचा पंचनामा तयार केला. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष जप्ती पंचनामा केला व मी त्यावर वाचुन समजुन सही केली. हे म्हणने खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.04.13 15:17:34 +0530

| | |
|---|---|
| **( एम. के. गोटे )** | **( एम. के. गोटे )** |
| न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, | न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, |
| शेगाव. (कोर्ट नं.२) | शेगाव. (कोर्ट नं.२) |
| **दिनांक – १३.०४.२०२६.** | **दिनांक – १३.०४.२०२६** |